आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय.
जुने जकात घर, दुसरा मजला, फोर्ट, मुंबई - ४०० ०२३

---

**प रि प त्र क**

क्रमांक. सीएलआर. ११/२००५/दे.वि.स्थलांतर/सात. मुंबई, ७ मे, २००५.

विषय:- देशी विदेशी मद्य विक्री अनुज्ञप्तीचे स्थलांतर प्रस्ताव पाठवितेवेळी लक्षात घ्यावयाच्या बाबी.

.........

देशी विदेशी मद्य विक्रीच्या अनुज्ञप्ती स्थलांतराबाबत शासन अधिसूचना दि. २०.४.२००५ अन्वये सुधरित नियम प्रसिध्द केलेले आहेत. या सुधारित नियमात अंतर्भूत केलेल्या ठळक बाबीबाबत या कार्यालयाचे समक्रमांकाचे परिपत्रक दि. ६.५.२००५ अन्वये सर्व संबंधीतांना सूचना प्रस्तृत केलेल्या आहेत. या नियमा अन्वये अनुज्ञप्ती तालुका अंतर्गत कोणत्याही ठिकाणी, जिल्हयातील एका तालुक्यातून दुसऱ्या तालुक्यातील कोणत्याही ठिकाणी आणि एका जिल्हयातून दुसऱ्या जिल्हयातील कोणत्याही ठिकाणी स्थलांतराबाबतची तरतूद केलेली आहे. असे स्थलांतराचे प्रस्ताव मान्य करतेवेळेस / पाठवितेवेळेस खाली नमूद केलेल्या मुद्यास अनुसरुन प्रस्ताव पाठविण्यात यावे.

**अ) देशी विदेशी घाऊक मद्य विक्रीच्या अनुज्ञप्त्या स्थलांतराबाबत.**

महाराष्ट्र देशी दारु नियमावली, १९७३ मधील नियम १५(१) अन्वये सीएल.२ अनुज्ञप्तीच्या गोडाऊनसाठी ४५ चौ. मी. अथवा एका वेळेस २५०० मद्य पेटया साठवणूक होवू शकेल एवढे क्षेत्रफळ तसेच मुंबई विदेशी मद्य नियमावली, १९५३ मधील नियम ५ (ए) अन्वये एफएल.१ अनुज्ञप्तीच्या गोडाऊनसाठी १०० चौ. मी अथवा एका वेळेस ५०० मद्य पेटया साठवणूक होवू शकेल एवढे क्षेत्रफळ आवश्यक केलेले आहे. नियमातील तरतूदीनुसार अनुज्ञप्तीचे स्थलांतर तालुका अंतर्गत जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने, एका तालुक्यातून दुसऱ्या तालुक्यात आयुक्तांच्या मान्यतेने व एका जिल्हयातून दुसऱ्या जिल्हयात शासनाच्या पूर्व मान्यतेने करण्याची तरतूद केलेली आहे. असे स्थलांतराचे प्रस्ताव सादर करतेवेळेस अनुज्ञप्तीच्या जागेविषयी पडताळणी करुन प्रस्तावित जागा ही नियमात नमूद केलेल्या क्षेत्रफळाची अथवा एका वेळेस मद्य साठा साठवणूक होईल एवढया क्षेत्रफळाची असणे आवश्यक आहे. जागेविषयी इतर बाबी व कागदपत्रे अनुज्ञप्तीची जागा नव्याने संजूर करतेवेळेस

A:\Circular of Shifting

जावक 2250
दिनांक 9/5/05

जा आवश्यक असतात त्याची पूर्तता अशा स्थलांतर प्रकरणी प्रस्ताव सादर करताना / मंजूर करताना करण्यात यावी.

ब) **देशी विदेशी किरकोळ मद्य विक्रीच्या अनुज्ञप्तीचे स्थलांतर करतेवेळेस :-**

देशी विदेशी किरकोळ मद्य विक्रीच्या अनुज्ञप्ती स्थलांतर करतेवेळेस संबंधीत नियमावलीत तरतूद केलेली आहे. या तरतूदीनुसार तालुका अंतर्गत कोणत्याही ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्व मान्यतेने, जिल्हयातील एका तालुक्यातून दुसऱ्या तालुकत्यातील कोणत्याही ठिकाणी आयुक्तांच्या पूर्व मान्यतेने व एका जिल्हयातून दुसऱ्या जिल्हयात तील कोणत्याही ठिकाणी शासनाच्या पूर्व मान्यतेने स्थलांतर करता येईल. तालुका अंतर्गत व एका जिल्हयातून दुसऱ्या जिल्हयात अनुज्ञप्ती स्थलांतराबाबत कोटयाचे निर्बंध लागू केलेले नाहीत. या अनुज्ञप्तीचे स्थलांतराचे प्रस्ताव पाठवितेवेळेस खालील बाबींची पूर्तता झाल्यानंतरच प्रस्ताव पूर्व मान्यतेसाठी आयुक्त कार्यालयात सादर करण्यात यावे.

१) अनुज्ञप्ती जिल्हयातील एका तालुक्यातून दुसऱ्या तालुक्यात स्थलांतर करतेवेळेस जिल्हयात चालू असलेल्या अनुज्ञप्ती दुकानाच्या एकूण संख्येच्या १५% पेक्षा जास्त असू नये अशी तरतूद केलेली आहे. तसेच यामध्येच यापूर्वी शासनाच्या धोरणानुसार स्थलांतरीत झालेल्या अनुज्ञप्तीच्या संख्येचा समावेश केलेला आहे. असे प्रस्ताव पाठवितेवेळेस सध्या कार्यरत असलेली अनुज्ञप्तीची संख्या, यापूर्वी स्थलांतरीत झालेल्या अनुज्ञप्तीची संख्या , १५% अन्वये स्थलांतरीत करावयाच्या अनुज्ञप्तीचे प्रस्ताव व सध्याचा प्रस्ताव कितवा आहे याबाबत अहवालात स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. एकाच महानगरपालिकेत अथवा नगरपालिका क्षेत्रात एकापेक्षा अधिक तालुके असले तरी त्यांच्या बाबतीत अनुज्ञप्ती एका तालुक्यातून दुसऱ्या तालुक्यात स्थलांतर करण्याबाबतचे सर्व नियम लागू राहतील व अशा स्थलांतर प्रकरणी आयुक्तांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहिल. यापूर्वी काही जिल्हयातून एकाच महानगरपालिका क्षेत्रात एका पेक्षा अधिक तालुके असले तरी प्रस्ताव मान्यतेसाठी या कार्यालयास सादर केले जात नव्हते. याबाबतीत यापूर्वी जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने अनुज्ञप्तीचे स्थलांतर एका तालुक्यातून दुसऱ्या तालुक्यात झाले असल्यास त्यांची संख्या यापूर्वी स्थलांतर झालेल्या अनुज्ञप्तीमध्ये धरुन उपरोक्त सूचना अन्वये अहवालामध्ये नमूद करण्यात यावे.

२) १५% अनुज्ञप्ती स्थलांतराचे प्रस्ताव सादर करतेवेळेस त्यामध्ये ग्रामपचांयत, ग्रामसभा किंवा महिला सामाजिक संघटनांनी ठराव पारित केल्यामुळे बंद केलेल्या व बंद करणे आवश्यक

असलेल्या अनुज्ञप्तीच्या स्थलांतरासाठी १५% कोटयाचे निर्बंध लागू राहणार नाही. तसेच याच कारणानी पूर्वी स्थलांतरीत झालेल्या अनुज्ञप्तींची संख्या याचाही समावेश एकूण स्थलांतरीत झालेल्या अनुज्ञप्ती संख्येमध्ये करण्यात येवू नये. ग्रामपंचायत अथवा ग्रामसभा अथवा सामाजिक महिला संघटना यांनी कोणत्या पध्दतीने ठराव पारित केल्यास अनुज्ञप्ती बंद करण्याची तरतूद शासनाच्या दि.३० जून, २००८ च्या आदेशामध्ये केलेली आहे. या आदेशातील तरतूदीनुसार ठराव पारित केल्यानंतरच अनुज्ञप्ती बंद करण्याबाबतची अथवा इतरत्र स्थलांतर करण्याची कारवाई करावी. या ठरावापैकी ग्रामसभेच्या [illegible] किमान ५०% मतदार उपस्थित राहणे आवश्यक आहे असा स्पष्ट उल्लेख असल्याने ग्रामसभेचा ठराव विचारात घेताना त्यामध्ये एकुण मतदाराच्या ५०% मतदारांनी उपस्थित राहून साध्या बहुमताने ठराव पारित केला आहे किंवा कसे याबाबतची खात्री केल्यानंतरच ही अनुज्ञप्ती बंद / स्थलांतराबाबतची कारवाई करावी.

३) अनुज्ञप्ती इतर ठिकाणी स्थलांतर करण्याबाबत मागील तीन वर्षाच्या मद्य विक्रीमध्ये सातत्याने घट होणे अशी अट नमूद केलेली आहे. याबाबतीत देशी मद्य विक्रीच्या अनुज्ञप्तीची मागील तीन वर्षांची माहिती वर्षनिहाय ब.लि. मध्ये तर एफएल.२ अनुज्ञप्ती स्थलांतराबाबत फक्त विदेशी मद्य विक्रीची माहिती वर्षनिहाय ब.लि. मध्ये देण्यात यावी. अनुज्ञप्तीचे व्यवहार मागील तीन वर्षापासून अथवा त्यापेक्षा कमी कालावधीसाठी बंद असल्यास तसे अहवालात नमूद करुन बंद वर्षातील मद्य विक्री शुन्य दर्शविण्यात यावी. अनुज्ञप्ती स्थलांतरासाठी ही प्रमुख अट असल्याने सदरील माहिती प्रस्तावा सोबत सादर करतेवेळेस विभागीय निरीक्षक व अधीक्षकांनी स्वाक्षांकीत करणे आवश्यक राहील.

४) ज्या भागातून अनुज्ञप्ती स्थलांतर होणार आहे त्या भागात राहणाऱ्या लोकांची पिण्याची गैरसोय होवू नये या अटीबाबत ज्या गावातून देशी विदेशी अनुज्ञप्तीचे स्थलांतर होणार आहे त्या गावची लोकसंख्या व स्थलांतरानंतर त्या भागात राहणाऱ्या दुकानाची संख्या नमूद करण्यात यावी. जर ती अनुज्ञप्ती त्या भागातून स्थलांतर झाल्यास मद्य पिणाऱ्या लोकांस पर्यायी व्यवस्था काय आहे व त्यामुळे त्या भागातील मद्य पिणाऱ्या लोकांची गैरसोय होणार किंवा नाही याबाबत विभागीय निरीक्षक व अधीक्षकांनी त्यांचे अभिप्राय स्पष्टपणे नोंदविण्यात यावेत.

५) अनुज्ञप्तीची जागा ज्या ग्रामपंचायत भागात स्थलांतरीत करावयाचे प्रस्तावित केलेले आहे त्या ग्रामपंचायतीने ग्रामसभा घेवून नाहरकत दाखला देण्याचे बंधनकारक केलेले आहे. बऱ्याच वेळा

प्रस्तावा सोबत ग्रामपंचायतीने त्यांच्या मासिक सभेत ठराव करुन अशा ठरावाच्या आधारे ना हरकत सादर केले जातात. परंतू संबधीत नियमा अन्वये याबाबत ग्रामसभेचा ठराव घेवून नाहरकत देणे बंधनकारक केले असल्याने येथून पुढे प्रस्तावा सोबत या पध्दतीने नाहरकत प्राप्त करुन घेण्यात यावे. तसेच ग्रामपंचायतीच्या भागा व्यतीरिक्त इतर भागात अनुज्ञप्ती स्थलांतरीत करावयाची असल्यास संबंधीत नगरपरिषदेची ना-हरकत घेण्याबाबत तरतूद केलेली आहे. त्याप्रमाणे अशा नगरपरिषदेच्या मुख्य अधिकाऱ्यांची या प्रकरणी नाहरकत घेण्यात यावी. अनुज्ञप्ती महानगरपालिका क्षेत्रात स्थलांतर होत असल्यास त्यासाठी ना हरकत घेण्याचे नियमात तरतूद केलेली नाही. त्यामुळे या क्षेत्रात स्थलांतरीत होणाऱ्या अनुज्ञप्तीच्या बाबत अशी नाहरकत घेण्याची आवश्यकता नाही.

६) एफएल.२ व सीएल.३ अनुज्ञप्तीची प्रस्तावित जागा ही त्या नियमावलीच्या संबंधीत नियमा अन्वये अंतरनिर्बंध मुक्त असावी. सदरील जागेची पडताळणी निरीक्षक व त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्याकडून करुन घेण्यात यावी. त्यासाठी प्रस्तावित जागेच्या नकाशाच्या तीन प्रती (ब्ल्यू प्रिंट) घेण्यात याव्यात. त्याचप्रमाणे ज्या जागी अनुज्ञप्ती स्थलांतरीत करावयाचे प्रस्तावित केलेले आहे त्या जागेचे बांधकाम अधिकृत असावे व त्यासाठी स्थानिक प्राधिकाऱ्याचा दाखला घेण्यात यावा.सदरील दाखला हा संबंधीत स्थानिक संस्थेच्या सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला असावा. ग्रामपंचायतीच्या बाबतीत ग्रामसेवक / ग्राम सुधारणा अधिकारी, नगरपरिषदेच्या बाबतीत मुख्य अधिकारी तर महानगरपालिकेच्या बाबतीत सहाय्यक आयुक्त व त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्याचा असा दाखला घेणे आवश्यक आहे.

ज्या अनुज्ञप्त्या ग्रामपंचायत किंवा ग्रामसभा किंवा महिला सामाजिक संघटनेने ठराव पारित केल्यामुळे किंवा गावांतील, नगरपरिषद / महानगरपालिकेच्या वार्डातील मतदाराने निवेदन दिल्यामुळे बंद केली असल्यास अशा अनुज्ञप्तीच्या स्थलांतराबाबत वरील परिच्छेद क्र.व (१),(३) व (४) मध्ये नमूद केलेल्या बाबी लागू होणार नाहीत. परंतू इतर उर्वरित सर्व बाबी / अटी याही अनुज्ञप्ती स्थलांतराबाबत लागू राहतील.

एफएल.२ अनुज्ञप्तीमधून विदेशी मद्याची विक्री ही स्वतंत्र उपभोगाकरिता (Off Consumption) होत असल्याने याबाबत प्रस्तावित ठिकाणचा पोलिस अहवाल मागविण्याची आवश्यकता नाही. देशी दारु किरकोळ विक्री अनुज्ञप्तीच्या बाबतीत प्रस्तावित ठिकाणचा जातीय दंगलीबाबतचा अहवाल मागविण्यात यावा. याबाबतीत परवानाकक्ष अनुज्ञप्ती मंजूर करण्याच्या अटी

मध्ये शासनाने पोलिस विभागाने याबाबतचा अहवाल एक महिन्याच्या आत सादर करावा. जर असा अहवाल एक महिन्याच्या आत प्राप्त / सादर झाला नाही तर आणखी एक महिन्याची मुदतवाढ देण्यात यावी आणि यानंतरही पोलिस विभागाने त्यांचा अहवाल सादर केला नाही तर पोलिस विभागाची हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कारवाई करण्यात यावी.

अनुज्ञप्ती एका जिल्हयातून दुसऱ्या जिल्हयातील कोणत्याही ठिकाणी स्थलांतर करण्यास शासनाच्या पूर्व मान्यतेची आवश्यकता आहे. याबाबतीचे प्रस्ताव सादर करतेवेळेस ज्या जिल्हयातून अनुज्ञप्ती स्थलांतर होणार आहे त्या जिल्हयातील अधीक्षकांनी असा अर्ज प्राप्त झाल्यानंतर या परिपत्रकातील परिच्छेद ब(३) व (४) अन्वये अनुज्ञप्तीच्या मागील तीन वर्षांच्या मद्य विक्रीची आकडेवारी प्राप्त करुन जर मद्य विक्रीत मागील तीन वर्षे सातत्याने घट झाली असल्यास व अशी अनुज्ञप्ती स्थलांतरीत केल्यास त्या भागातील मद्य पिणाऱ्या लोकांची गैरसोय होणार नाही या दोन्ही बाबीची नियमातील तरतूदीनुसार खात्री करावी. जर विक्री मध्ये सातत्याने घट झाली असल्यास आणि भागातील मद्य पिणाऱ्या लोकांची गैरसोय होणार नसल्यास अनुज्ञप्तीधारकाकडून ज्या जिल्हयात अनुज्ञप्ती स्थलांतरीत होणार आहे त्या जिल्हयातील जागेविषयीचे कागदपत्रे प्राप्त करुन घेवून ते संबंधीत जिल्हयाच्या अधीक्षकांना पडताळणीसाठी पाठवावे व त्या अधीक्षकांनी परिपत्रकात नमूद केलेल्या जागेविषयी बाबींची पडताळणी करुन अहवाल संबंधीत जिल्हा अधीक्षकांना सादर करावा. असा अहवाल प्राप्त झाल्यानंतर अधीक्षकांनी त्यांना व प्राप्त झालेल्या अधीक्षकांच्या अहवाला अन्वये संयुक्तीक अहवाल या कार्यालयास सादर करावा व त्यामध्ये या परिपत्रकात नमूद केलेल्या सर्व बाबींचा अंतर्भाव करण्यात यावा.

येथून पुढे देशी विदेशी मद्य विक्रीच्या घाऊक व किरकोळ अनुज्ञप्त्या स्थलांतराचे प्रस्ताव जिल्हा स्तरावर मंजूर करतेवेळेस अथवा या कार्यालयास सादर करतेवेळेस वर नमूद केलेल्या सूचनांचे व अधिसूचनातील नियमांचे कटाक्षाने पालन करण्यात यावे. तसेच या परिपत्रकाची पोच देण्यात यावी.

(सी.एस. संगीतराव)
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१) सर्व जिल्हाधिकारी,
२) सर्व विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
३) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.
४) या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी.
५) या कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी.
६) अभिलेख शाखा ५ प्रती.
७) आयुक्तांचे स्वीय सहाय्यक २ प्रती.